138.

# नोकरीच्या ठिकाणी महिलांवरील होणारे अत्याचार

**प्राचार्य डॉ. घोडके**
संशोधन मार्गदर्शक,
लोकमान्य महाविद्यालय,
सोनखेड जि.नादेड

**प्रा. सौ. रायठक डी.व्ही.**
संशोधक विद्यार्थीनी तथा
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गंगाखेड जि.परभणी.

**प्रस्तावनाः**

लैंगिक असमानता इंडेक्स २०१४ मध्ये भारत १४२ देशांमध्ये १३२व्या क्रमांकावर आहे. लैंगिक अत्याचाराची व्याप्ती ही दिवसेंदिवस वाढतच असलेली दिसून येते. कारण स्त्रियांचा सामाजिक जीवनात झालेला सहभाग तसेच सामाजिक परिस्थिती, लिंगभेदावर आधारीत संस्काराची व्यवस्था, बदलती सामाजिक जीवनाची मूल्ये, सोशल नेटवर्क, पॉर्नसाईट्स, बेकारी, निरक्षरता इत्यादी साधने त्यासाठी काही प्रमाणात जबाबदार आहेत.

नोकरी व्यवसाय करणाऱ्या आणि शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया विशेषतः लैंगिक अत्याचाराच्या शिकार होतात. परंतु त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणीत सरकार उदासीन असल्यामुळे त्याचे परिणाम अजूनही म्हणावे तसे समोर आलेले नाहीत. अनेक कायदे, योजना, संरक्षण स्त्रियांना देण्यात आलेले आहे, पण तरीदेखील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात वाढ होत आहे. महिलांसोबत अश्लिल बोलणे, तिच्या परवानगीशिवाय जवळीकता साधणे वा तसा प्रयत्न करणे, हावभाव करणे या कायद्याच्या अंतर्गत आणले आहे.

महिलांची होणारी टिंगल, छळ, लैंगिक शोषण, छेडछाड प्रकार बंद व्हावे या दृष्टिने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ अधिनियम २०१३ या कायद्याबाबत जाणीव जागृती केली पाहिजे. प्रत्येक ठिकाणी या विषयात स्थानिक तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा छळ या विषयावर जनजागृतीसाठी 'पिपल अगेन्स्ट सेक्चुअल हॅरस्मेन्ट' या कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यापीठात विद्यार्थीनींचे व महिला कर्मचाऱ्यांचे प्रबोधनाचे कार्यक्रम सुरू आहेत.

**सामाजिक संशोधन पद्धतीः**

१. नोकरीच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराचा अभ्यास करणे.
२. लैंगिक अत्याचाराच्या कारणांचा शोध घेणे.
३. उपाययोजना सूचविणे.

**संशोधन पद्धतीः**

प्रस्तुत संशोधन लेख लिहिण्यासाठी द्वितीय सामग्रीचा अवलंब करण्यात आला असून त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, शोध निबंध, वर्तमान पत्रे, इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**लैंगिक अत्याचाराची कारणेः**

१) भारतात नोकरीच्या ठिकाणी स्त्रियांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनात वाढ होताना दिसून येते. एवढेच नाही तर बलात्कार सुद्धा होत आहेत.
२) सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत मुलाला मुलीसारखे संवेदनशील बनविले जात नाही. आक्रमकता, निर्भिडता हे गुण मुलांना शिकविले जातात. त्यामुळे आपल्या गैरवागणूकीचा महिलांवर होणाऱ्या परिणामाची संवेदनशीलता मुलामध्येही नसते. म्हणूनही स्त्रियांवर अत्याचार होतो.
३) स्त्रिकडे व्यक्ती म्हणून पाहिले जात नाही तर उपभोगाची वस्तू असाच दृष्टिकोन दिसून येतो.

४) स्त्रियांना रात्रपाळीचे काम दिले जाते, पण त्यासाठी आवश्यक सुरक्षिततेचा अभाव असल्यामुळे लैंगिक अत्याचार घडून येतात.

५) बऱ्याचवेळेस कार्यालयातील अधिकारी हे बढती व बोनसच्या नावाखाली महिला कर्मचाऱ्यांवर लैंगिक अत्याचार करतो.

**उपाययोजनाः**

१) माननीय सर्वोच्च न्यायालयाने १८ ऑक्टोबर २०१२ रोजी निर्णय दिला की, नोकरीच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला रोखण्यासाठी विशाखा निर्देश लागू केले पाहिजेत.

२) भारतीय चिकित्सा परिषद व बार कौन्सिल ऑफ इंडियाला असा निर्देश दिला की, त्यांना अत्याचारांना थांबविण्यासाठी समित्या स्थापन करणे बंधनकारक आहे.

३) नोकरीच्या ठिकाणी स्त्रियांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण हा त्यांचा संविधनिक हक्क आहे.

४) नोकरीच्या ठिकाणी लैंगिक अत्याचारासंबंधी नियमांना अधिसूचित करून त्याचे प्रकाशन व वितरण केले पाहिजे.

५) स्त्री-पुरूषांमधील जैविक फरकांना श्रेष्ठ-कनिष्ठतेचे लावलेला लेबल हे मानवनिर्मित आहे. लिंगभाव समानतेच्या आधारावर त्याचे विश्लेषण केले गेले पाहिजे आणि विचार व कृतीतही बदल केला पाहिजे.

**सारांशः**

नोकरीच्या ठिकाणी महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण दिवसेनदिवस वाढतच आहे. स्त्री-पुरूषांना मिळणारे स्वातंत्र्य, मोकळे वातावरण, या निमित्ताने येणारे संबंध, शिक्षण, बेकारी, प्रसार माध्यमे इत्यादीमुळे कामभावनांना मिळणारे उत्तेजन व त्याचे होणारे परिणाम या कारणांमुळे स्त्रियांवर लैगिक अत्याचार वाढत आहे.

या संदर्भात अनेक कायदे झालेले आहेत, पण त्यांच्या अंमलबजावणीत दोष आहे. त्यासाठी सरकारकडे राजकीयं इच्छाशक्ती असणे गरजेचे आहे. तसेच स्त्री-पुरूषाची मानसिकता बदलली पाहिजे. तरच लैंगिक अत्याचाराला काही प्रमाणात आळा बसू शकेल.

**संदर्भग्रंथ सूचिः**

१) लोकसत्ता, दि.२१ जुलै २०१२.
२) लोकसत्ता, दि.२९ सप्टेंबर २०१२.
३) सामाजिक संशोधन पद्धती, डॉ. प्रदीप आगलावे, विद्या प्रकाशन, नागपूर.
४) स्त्री-पुरूष तुलना, श्री ताराबाई शिंदे, राजेश प्रकाशन, २६-गिरीजा सोसायटी, पुणे.
५) लोकसत्ता, दि.२१ जुन २०१४.

❏❏❏